**दिव्यांग व्यक्तीचे हक्क अधिनियम, 2016 अनुसार राज्य आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्ये.**

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- दिव्यांग-2025/प्र.क्र.19 /कार्यासन -1.**
31,32,35 "ए" विंग, तिसरा मजला, मित्तल टॉवर
बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरिमन पॉईंट,
मंत्रालय, मुंबई - 400 021.
दिनांक :- 31 ऑक्टोबर, 2025.

<u>संदर्भ</u> -: **1.** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016
**2.** दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2017
**3.** महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2024

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र शासन दिव्यांग व्यक्तींचे सन्मान, हक्क, सुरक्षा आणि सक्षमीकरण करण्यास कटिबद्ध आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 दिव्यांग व्यक्तींना समान संधी, न्याय, सन्मान व सर्वांगीण विकासाची हमी देतो, तसेच त्यांचे पुनर्वसन व सक्षमीकरण सुनिश्चित करतो.

2. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 79 ते 83 नुसार, राज्य आयुक्तांची नियुक्ती त्यांचे कार्य व अधिकार, तसेच राज्य आुयक्तांनी दिलेल्या शिफारशीवर संबंधीत प्राधिकरणांनी करावयाच्या कार्यवाहीसंबंधी तरतुदी करण्यात आल्या आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 79 नुसार शासनाने "राज्य आयुक्त" म्हणून "आयुक्त, दिव्यांग कल्याण" यांना अधिसुचित करण्यात येत आहे.

राज्य आयुक्तांचे कार्य हे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 80 मध्ये नमूद केले आहे. त्यामध्येच कलम 80 (ब) नुसार राज्य आयुक्तांचे महत्वपूर्ण कार्य म्हणजे, स्वत:हून (Suo moto) अथवा इतर प्रकारे, दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांचे उल्लंघनाबाबतच चौकशी करणे. ज्या प्रकरणामध्ये राज्य शासन हे संबंधित प्राधिकरण आहे, त्या विषयांबाबत संबंधित प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देणे, त्याबाबत चौकशी करणे, आणि आवश्यक सुधारात्मक कार्यवाही करणे.

3. त्यानुषंगाने, "राज्य आयुक्तांच्या" कार्याची प्रभावी, पारदर्शक व सुसूत्र अंमलबजावणीसाठी, तसेच दिव्यांग व्यक्तिंच्या हक्कांच्या संरक्षणासंबंधी चौकशी, तपासणी व कार्यवाही यासाठी एकसमान

मानक कार्यपध्दती (Standard operating procedure – SOP ) विकसित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

**शासन निर्णय:-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 79 नुसार शासनाने “राज्य आयुक्त” म्हणून “आयुक्त, दिव्यांग कल्याण” यांना अधिसुचित करण्यात येत आहे. कलम 80 नुसार, “राज्य आयुक्त” स्वतःहून (Suo Moto) अथवा प्राप्त झालेल्या तक्रारींवर कार्यवाही करतील. दिव्यांगांच्या हक्कांचे उल्लंघन झाल्यास चौकशी करून आवश्यक कार्यवाही करतील/ निर्देश देतील.

2. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 82 नुसार राज्य आयुक्तांसमोरील सर्व कार्यवाहीसाठी, दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील. दिवाणी प्रक्रिया संहिता 1908 च्या CODE 5 नुसार आयुक्तांना खालीलप्रमाणे अधिकार असतील.

1. साक्षीदारांना हजर राहण्यासाठी Summons पाठविणे,
2. कागदपत्रे सादर करणे,
3. कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणतेही सार्वजनिक दस्त किंवा त्याची प्रत मागविणे,
4. शपथपत्रावर पुरावे स्विकारणे, आणि
5. साक्षीदार किंवा कागदपत्रांच्या तपासणीसाठी “आयोग (Commision)” नेमण्याचे अधिकार.

3. भारतीय दंड संहिता 1860 च्या कलम 193 आणि 228 अनुसार “राज्य आयुक्तांसमोरील” प्रत्येक कार्यवाही ही न्यायिक कार्यवाही असेल आणि फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 195 प्रकरण XXVI नुसार “राज्य आयुक्त” दिवाणी न्यायालय म्हणून काम पाहतील.

**4. राज्य आयुक्तांकडून अनुसरली जाणारी प्रक्रिया**

4.1 स्वतःहून कार्यवाही (Suo Moto Action): राज्य आयुक्त हे कलम 80 (ब) अंतर्गत अधिकारांचा वापर करून अहवाल, तपासणी, माध्यमे किंवा विश्वसनीय स्त्रोतांवर आधारित तक्रारींची चौकशी करतील आणि त्यानुसार कार्यवाही करतील.

4.2 तक्रार नोंदणी: दिव्यांग व्यक्ती किंवा त्यांचे पालक/ पालक प्रतिनिधी/ कायदेशीर प्रतिनिधी राज्य आयुक्तांकडे तक्रार नोंदवू शकतात.

4.3 प्रत्येक तक्रारीमध्ये खालील तपशील असणे अनिवार्य असेल.

अ. तक्रारदाराचे नाव व पत्ता ,

ब. प्रतिवादीचे नाव, वर्णन आणि पत्ता ,

क. तक्रार व तक्रारीचे स्वरूप

ड. पुरावे (उदा; Documents, Videos, Photos, Images etc.)

इ. तक्रारदाराने मागितलेली मदत.

4.4 वरील मसुद्यात तक्रार प्राप्त झाल्यानंतर "राज्य आयुक्त", प्रतिवादीला त्यांचे उत्तर दाखल करण्यासाठी/ आपले म्हणणे मांडण्यासाठी सदर तक्रारीची प्रत तात्काळ नोटीसद्वारे पाठवतील.

4.5 "राज्य आयुक्तांनी" प्रतिवादीला निर्गमित केलेली नोटीस, प्रतिवादीला मिळाल्यापासून जास्तीत जास्त 15 दिवसांच्या आत प्रतिवादी लेखी उत्तर दाखल करतील. त्यानंतर 30 दिवसांत "राज्य आयुक्त" सुनावणी पूर्ण करतील.

4.6 सुनावणी:- सुनावणीसाठी निश्चित केलेल्या तारखेला तक्रारदार व प्रतिवादी किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी राज्य आयुक्तांसमोर हजर राहतील.

4.7 "राज्य आयुक्त" यांनी निश्चित केलेल्या तारखेला, तक्रारदार आणि प्रतिवादीस उपस्थित राहण्याकरिता नोटीस बजावतील. जर कोणत्याही कारणास्तव तक्रारदार/ प्रतिवादी अनुपस्थित असतील तर त्यांनी अधिकृत केलेले प्रतिनिधी सुनावणीसाठी हजर राहू शकतील.

4.8 सुनावणीच्या तारखेला जर तक्रारदार किंवा त्यांचे अधिकृत केलेले प्रतिनिधी सुनावणीसाठी कोणतेही कारण न देता अनुपस्थित राहिले, तर "राज्य आयुक्त" सदर तक्रार हलगर्जीपणा/दुर्लक्ष म्हणून फेटाळू शकतील/ गुणवत्तेनुसार निर्णय घेऊ शकतील.

4.9 सुनावणीच्या तारखेला जर प्रतिवादी किंवा त्यांनी अधिकृत केलेले प्रतिनिधी सदर सुनावणीसाठी अनुपस्थित राहिले तर, "राज्य आयुक्त" दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 82 अन्वये, प्रतिवादीला उपस्थित राहण्याकरिता "समन्स" बजावू शकतील.

4.10 एकतर्फी निर्णय (*Exparte* decision): प्रतिवादीला आपले म्हणणे मांडण्यास नोटीस बजावून देखील किंवा हजर राहण्यासाठी/उपस्थित राहण्यासाठी समन्स बजावून सुध्दा, जर नोटीसचे पालन केले नाही तर "राज्य आयुक्त" एकतर्फी निर्णय घेऊ शकतील.

4.11 राज्य आयुक्त योग्य कारणासाठी व योग्य त्या अटींवर कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर तक्रारीची सुनावणी स्थगित करू शकतील.

4.12 सुनावणी पूर्ण झाल्याच्या 15 दिवसांत "राज्य आयुक्त" सदर प्राप्त तक्रारींबाबत निर्णय देतील व सदर निर्णय संबंधितास कळवतील.

4.13 स्वतःहून (Suo Moto) अथवा प्राप्त झालेल्या तक्रारींवर तक्रार प्राप्त झाल्यापासून "राज्य आयुक्त" सर्व प्रक्रिया 60 दिवसात पूर्ण करतील.

**5. राज्य आयुक्तांची शिफारसः-**

"राज्य आयुक्तांनी" केलेल्या शिफारशींवर संबंधित प्राधिकरणाने कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

5.1 कार्यवाही: संबंधित प्राधिकरण "राज्य आयुक्तांच्या" केलेल्या शिफारशीवर कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जास्तीत जास्त 90 दिवसांच्या आत "राज्य आयुक्तांना" सादर करतील.

5.2 शिफारस नाकारणे: "राज्य आयुक्तांनी" केलेल्या शिफारशी स्वीकारणे शक्य नसल्यास त्याची कारणे लेखी स्वरूपात "राज्य आयुक्त" व तक्रारदारास 90 दिवसाच्या आत कळविणे अनिवार्य राहील.

5.3 एखाद्या प्राधिकरणाने राज्य आयुक्तांची शिफारस नाकारल्यास आणि ती नाकारण्याची कारणमिमांसा योग्य नसल्यास "राज्य आयुक्त" त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करतील.

**6. प्रभावी अंमलबजावणी (कलम 80-82 अनुसार)**

6.1 राज्य आयुक्तांनी मागितलेली आवश्यक माहिती व अनुपालन अहवाल सर्व अधिकारी/ प्राधिकारी यांना सादर करणे बंधनकारक असेल.

6.2 राज्य आयुक्तांच्या निर्देशांचे पालन न केल्यास, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 89 आणि कलम 93 अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

6.3 त्यानंतर सुद्धा राज्य आयुक्तांच्या निर्देशाचे पालन न केल्यास संबंधित अधिकारी/ प्राधिकारी यांच्याविरुद्ध प्रशासकीय तसेच शिस्तभंगात्मक कार्यवाही करण्यात येईल.

**7. शासनास अहवाल सादर करणे.**

"राज्य आयुक्त" शासनास परीशिष्टाप्रमाणे त्रैमासिक व वार्षिक अहवाल सादर करतील.

8. शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५१०३११५२०१६१३३५ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

TUKARAM H MUNDHE

Digitally signed by TUKARAM H MUNDHE
DN: CN = TUKARAM H MUNDHE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = PDWD
Date: 2025.10.31 16:32:22 +05'30'

**(तुकाराम मुंढे)**
**सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति**

1) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
2) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.

3) मा. उपमुख्यमंत्री ( वित्त विभाग व नियोजन विभाग) यांचे सचिव, मंत्रालय मुंबई.
4) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग ) यांचे सचिव, मंत्रालय मुंबई.
5) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
6) मा.विधानसभा/विधान परिषद सर्व सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
7) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
8) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
9) आयुक्त, दिव्यांग कल्याण, आयुक्तालय, पुणे
10) सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय
11) सर्व आयुक्त, महानगरपालिका
12) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण कार्यालय,
13) सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर / मुंबई उप नगर.
14) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
15) सर्व समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद
16) भारतीय जनता पार्टी,महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१,योगक्षेमसमोर, वसंतराव नाईक चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई ४०० ०२१,
17) इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश, काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२५,
18) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग,नरिमन पॉईन्ट,मुंबई ४०००२१,
19) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ०२८,
20) बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी,मुंबई ४०००१३,
21) भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस,वरळी, मुंबई
22) भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई
23) महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई - ४०० ०२८,
24) निवड नस्ती/दिव्यांग कल्याण/कार्यासन-१.

# परिशिष्ट-अ

*(दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 चे कलम 80 नुसार राज्य आयुक्तांनी स्वतःहून दखल घेतलेली प्रकरणाची नोंदवही)*

| अ. क्र. | राज्य आयुक्तांनी स्वतःहून दखल घेतलेल्या प्रकरणाचा विषय | राज्य आयुक्तांनी स्वतःहून दखल घेतलेल्या प्रकरणाचा दिनांक | राज्य आयुक्तांनी स्वतःहून दखल घेतलेल्या प्रकरणाचे स्वरूप | प्रतिवादीला नोटीस दिल्याचा दिनांक | प्रतिवादीने उत्तर दाखल केल्याचा दिनांक | सुनावणीचा दिनांक | निकाला साठी सुनावणी बंद केल्याचा दिनांक | निकाल दिल्याचा दिनांक | निकाल निर्गमित केल्याचा दिनांक | निकालाच्या अनुपालनाच्य ा अहवालाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | | | | | |

आयुक्त
(दिव्यांग कल्याण, पुणे)

# परिशिष्ट-ब

*(दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 चे कलम 80   नुसार तक्रार प्रकरणांची नोंदवही)*

| अ. क्र. | तक्रारदाराचे नाव | तक्रार नोंदणीचा दिनांक | तक्रारीचे स्वरूप | नोटीस दिल्याचा दिनांक | प्रतिवादीने उत्तर दाखल केल्याचा दिनांक | सुनावणीचा दिनांक | निकालासाठी सुनावणी बंद केल्याचा दिनांक | निकाल दिल्याचा दिनांक | निकाल निर्गमित केल्याचा दिनांक | निकालाच्या अनुपालनाच्या अहवालाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | | | | | |

आयुक्त
(दिव्यांग कल्याण, पुणे)

# परिशिष्ट-क

*(दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 चे कलम 82 नुसार आयुक्तांनी केलेल्या कार्यवाहीचा त्रैमासिक अहवाल)*

| अ. क्र. | तक्रारदाराचे नाव | स्वतःहून (Suo Moto) दखल घेतलेल्या प्रकरणाचा दिनांक / तक्रार नोंदणीचा दिनांक | प्रतिवादी ला नोटीस निर्गमित केल्याचा दिनांक | प्रतिवादी ने दिलेल्या उत्तराचा दिनांक | सुनावणीचा दिनांक | राज्य आयुक्तांनी केलेली शिफारस | राज्य आयुक्तांनी सुनावणीचा निकाल मुदतीत दिला आहे /नाही | निकाल मुदतीत दिला नसल्यास त्याबाबतची कारणे | राज्य आयुक्तांनी केलेल्या शिफारशीचे अनुपालन केले किंवा नाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | | | | | | | |

आयुक्त
(दिव्यांग कल्याण, पुणे)

# परिशिष्ट-ड

*(दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 चे कलम 82 नुसार आयुक्तांनी केलेल्या कार्यवाहीचा वार्षिक अहवाल)*

| महिना | स्वतःहून (Suo Moto) दखल घेतलेल्या प्रकरणांची संख्या/ प्राप्त तक्रारीची संख्या | निकाली तक्रारीची संख्या | प्रलंबित तक्रारीची एकूण संख्या | विहित मुदतीत पारित केलेले आदेश | विहित मुदतीत पारित न केलेले आदेश | प्राप्त अनुपालन अहवाल | अप्राप्त अनुपालन अहवाल | कारणे / शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| जानेवारी | | | | | | | | |
| फेब्रुवारी | | | | | | | | |
| मार्च | | | | | | | | |
| एप्रिल | | | | | | | | |
| मे | | | | | | | | |
| जून | | | | | | | | |
| जुलै | | | | | | | | |
| ऑगस्ट | | | | | | | | |
| सप्टेंबर | | | | | | | | |
| ऑक्टोबर | | | | | | | | |
| नोव्हेंबर | | | | | | | | |
| डिसेंबर | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

आयुक्त
(दिव्यांग कल्याण, पुणे)